# Bavanna Shokli Gurucharitra

अथ ध्यानम् -

दिगंबरं भस्मसुगंध लेपनं चक्रं त्रिशूलं डमरुं गदां च

पद्मासनस्थं रविसोमनेत्रम दत्तात्रयं नमभीष्टसिद्धिदम् || १ ||

काषायवस्त्रं करदंडधारिणं कमंडलुं पद्मकरेण शंखम्

चक्रं गदाभूषितभूषणाढ्यं श्रीपादराजं शरणं प्रपद्ये || २ ||

कृते जनार्दनो देवस्त्रेतायां रघुनन्दनः

द्वापरे रामकृष्णौ च कलौ श्रीपादवल्लभः || ३ ||

गुरुचरित्र -

ॐ नमोजी विघ्नहरा

गजानना गिरिजाकुमरा

जयजयाजी लंबोदरा

शकदंता शूर्पकर्णा || १ ||

त्रिमूर्तिराजा गुरु तूंचि माझा

कृष्णातिरी वास करुनी ओजा

सद्भक्त तेथे करिती आनंदा

त्या देव स्वर्गी बघती विनोदा || २ ||

जयजयाजी सिद्धमुनी

तूं तारक भवार्णवांतुनी

संदेह होता माझे मनी
आजि तुवां कुडें केले ॥ ३ ॥

ऐशी शिष्याची विनंती
ऐकुनि सिद्ध काय बोलती
साधु साधु तुझी भक्ति
प्रीती पावो श्रीगुरुचरणी ॥ ४ ॥

भक्तजनरक्षणार्थ
अवतरला श्रीगुरुनाथ
सागरपुत्रांकारणें भगीरथें
गंगा आणिली भूमंडळी ॥ ५ ॥

तीर्थे असली अपार परी
समस्त सांडुनि प्रीति करी
कैसा पावला श्रीदत्ताची
श्रीपादश्रीवल्लभ ॥ ६ ॥

ज्यावरी असे श्रीगुरुची प्रीति
तीर्थमहिमा ऐकावया चित्ती
वांच्छा होतसे त्या ज्ञानज्योती
कृपामूर्ति यतिराया॥ ७ ॥

गोकर्णक्षेत्री श्रीपादयती
राहिले तीन वर्षे गुप्ती
तेथूनी गुरु गीरीपुरा येती

लोकानुग्रहाकारणें ॥ ८ ॥

श्रीपाद कुरवपुरी असतां
पुढें वर्तली कैसी कथा
विस्तारुनी सांग आतां
कृपामूर्ति दातारा ॥ ९ ॥

सिद्ध म्हणे नामधारकासी
श्रीगुरु महिमा काय पुससी
अनंतरुपे परियेसी
विश्र्वव्यापक परमात्मा ॥ १० ॥

सिद्ध म्हणे ऐक वत्सा
अवतार झाला श्रीपादहर्षा
पूर्ववृत्तांत ऐकिला ऐसा
कथा सांगितली विप्रस्त्रियेची ॥ ११ ॥

श्रीगुरु म्हणती जननीसी
आम्हा ऐसा निरोप देसी
अनित्य शरीर तूं जाणसी
काय भरवंसा जिविताचा ॥ १२ ॥

श्रीगुरुचरित्र कथामृत
सेवितां वांच्छा अधिक होत
शमन करणार समर्थ
तूचि एक कृपासिंधु ॥ १३ ॥

ऐकुनि शिष्याचे वचन
संतोष करी सिद्ध आपण
श्रीगुरु चरित्र कामधेनू जाण
सांगता झाला विस्तारे ॥ १४ ॥

ऐक शिष्या शिरोमणी
धन्य धन्य तुझी वाणी
तुझी भक्ति श्रीगुरुचरणी
लीन झाली परियेसी ॥ १५ ॥

विनवी शिष्य नामांकित
सिद्ध योगियातें पुसत
सांगा स्वामी वृत्तांत
श्रीगुरुचरित्र विस्तारें ॥ १६ ॥

ऐक शिष्या नामकरणी
श्रीगुरुभक्त शिखामणी
तुझी भक्ति श्रीगुरुचरणी
लीन झाली निर्धारि ॥ १७ ॥

ध्यान लागले श्रीगुरुचरणी
तृप्ति नोव्हें अंतःकरणी
कथामृत संजिवनी
आणिक निरोपावी दातारा ॥ १८ ॥

अज्ञान तिमिर रजनीत

निजलो होतो मदोन्मत्त

श्रीगुरुचरित्र वचनामृत

प्राशन केले दातारा || १९ ||

स्वामी निरोपिलें आम्हांसी

श्रीगुरु आले गाणगापुरासी

गौप्यरुपें अमरपुरासी

औदुंबरी असती जाण || २० ||

सिद्ध म्हणे नामधारका

ब्रह्मचारी कारणिका

उपदेशी ज्ञान विवेका

तये प्रेत जननीसी || २१ ||

तुझा चरणसंपर्क होता

झाले ज्ञान मज आतां

परमार्थी मन ऐकता

झाले तुझे प्रसादें || २२ ||

लोटांगणे श्रीगुरुसी

जाऊनि राजा भक्तिसी

नमस्कारी विनयेसी

एकभावें करुनियां || २३ ||

शिष्यवचन परिसुनी

सांगता झाला सिद्धमुनी

ऐक भक्ता नामकरणी

श्रीगुरुचरित्र अभिनव ॥ २४ ॥

सिद्ध म्हणे ऐक बाळा

श्रीगुरुची अगम्य लीला

सांगता न सरे बहुकाळा

साधारण मी सांगतसे ॥ २५ ॥

श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी

नको भ्रमुरे युक्तिसी

वेदांत न कळे ब्रह्मयासी

अनंत वेद असती जाण ॥ २६ ॥

चतुर्वेद विस्तारेसी

श्रीगुरु सांगती विप्रासी

पुढे कथा वर्तली कैसी

विस्ताराची दातारा ॥ २७ ॥

नामधारक म्हणे सिद्धासी

पुढील कथा सांगा आम्हांसी

उल्हास होतो मानसी

श्रीगुरुचरित्र अति गोड ॥ २८ ॥

पुढे कथा कवणेपरी

झाली असे गुरुचरित्री

निरुपावे विस्तारी

सिद्धमुनी कृपासिंधु || २९ ||

श्रीगुरुचरित्र सुधारस

तुम्ही पाजिला आम्हांस

परी तृप्त नव्हे गा मानस

तृषा आणिक होतसे || ३० ||

सिद्ध म्हणे नामधारका

पुढें अपूर्व झाले ऐका

योगेश्र्वर कारणिका

सांगे स्त्रियांचे स्वधर्म || ३१ ||

पतिव्रतेची रीती

सांगे देवासी बृहस्पती

सहगमनाची फलश्रुती

येणेपरी निरुपिली || ३२ ||

श्रीगुरु आले मठासी

पुढे कथा वर्तली कैसी

विस्तारुनि आम्हांसी

निरुपावें स्वामिया || ३३ ||

श्रीगुरु म्हणती दंपतीसी

ऐका पाराशरऋषी

तया काश्मीररायासी

रुद्राक्षमहिमा निरुपिला || ३४ ||

पुढें कथा वर्तली कैसी
विस्तारुनि सांगा वहिली
मति माझी असे वेधिली
श्रीगुरुचरित्र ऐकावया || ३५ ||

गांणगापुरी असतां श्रीगुरु
महिमा झाला अपरंपारु
सांगता नये विस्तारु
तावन्मात्र सांगतसे || ३६ ||

ऐसा श्रीगुरु दातारु
भक्तजना कल्पतरु
सांगता झाला आचारु
कृपा करुनि विप्रांसी || ३७ ||

आर्त झालो मी तृषेचा
घोट भरवीं गा अमृताचा
चरित्रभाग सांगे श्रीगुरुचा
माझे मन निववी वेगी || ३८ ||

सिद्ध म्हणे नामधारका
अपूर्व झाले ऐका
साठ वर्षे वांझ देखा
पुत्रकन्या प्रसवली || ३९ ||

सिद्ध म्हणे नामधारका
अपूर्व वर्तले आणिक ऐका
वृक्ष झाला काष्ट सुका
विचित्र कथा परियेसा ‖ ४० ‖

जयजयाजी सिद्धमुनी
तू तारक या भवार्णवांतुनी
नानाधर्म विस्तारुनि
श्रीगुरुचरित्र निरुपिले ‖ ४१ ‖

मागें कथानक निरुपिले
सायंदेव शिष्य भले
श्रीगुरुंनी त्यांसी निरुपिलें
कलत्र पुत्र आणि म्हणती ‖ ४२ ‖

श्रीगुरु म्हणती द्विजासी
या अनंत व्रतासी
सांगेन ऐका तुम्हांसी
पूर्वी बहुती आराधिले ‖ ४३ ‖

श्रीगुरु माझा मलिकार्जुन
पर्वत म्हणजे श्रीगुरु भुवन
आपण नये आतां येथून
सोडून चरण श्रीगुरुचे ‖ ४४ ‖

तू भेटलासी मज तारक
दैन्य गेले सकळहि दुःख
सर्वाभीष्ट लाधले सुख
श्रीगुरुचरित्र ऐकतां ॥ ४५ ॥

गाणगापुरीं असतां श्रीगुरु
ख्याती झाली अपारु
लोक येती थोरथोरु
भक्त बहुत झाले असती ॥ ४६ ॥

सांगेन ऐका कथा विचित्र
जेणें होय पतित पवित्र
ऐसे हें गुरुचरित्र
तत्परतेसी परियेसी ॥ ४७ ॥

श्रीगुरु नित्य संगमासी
जात होते अनुष्ठानासी
मार्गांत शूद्र परियेसी
शेती आपुल्या उभा असे ॥ ४८ ॥

त्रिमूर्तीचा अवतार
वेषधारी झाला नर
राहिले प्रीती गाणगापुर
कवण क्षेत्र म्हणूनिया ॥ ४९ ॥

तेणे मागितला वर

राज्यपद धुरंधर

प्रसन्न झाला त्यासी गुरुवर

दिधला वर परियेसा || ५० ||

राजभेटी घेउनी

श्रीपाद आले गाणगाभुवनी

योजना करिती आपुले मनीं

गौप्य रहावे म्हणूनिया || ५१ ||

म्हणे सरस्वती गंगाधर

श्रोतया करी नमस्कार

कथा ऐका मनोहर

सकळाभीष्ट लाधेल || ५२ ||

|| इति श्रीगुरुचरित्रकथाकल्पतरौ

सिद्धनामधारकसंवादे द्विपंचाशत् श्लोकात्मकं

गुरुचरित्र संपूर्णम् ||